जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 MAR 2019

महाराष्ट्र टाईम्स

# 'टीव्ही माध्यमांसमोर अनेक आव्हाने'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'देशातील टीव्ही माध्यमांसमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. विशेषतः महसूल मिळविण्याचे आव्हान सर्वांत मोठे आणि गंभीर आहे,' असे मत आयआयएमसीच्या ओडिशा येथील केंद्राचे विभागीय संचालक डॉ. मृणाल चटर्जी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या वतीने येथील निलांबरी हॉलमध्ये आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी हरियाणा येथील एसजीटी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. संजीव भानावत, मुंबईच्या एसएनडीटी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या प्रमुख डॉ. मीरा देसाई, गुजरात विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या प्रा. सोनल पांड्या आणि हिमालच प्रदेश विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या माजी प्रमुख डॉ. वीरबाला अग्रवाल, आदी उपस्थित होते.

प्रा. चटर्जी म्हणाले, 'भारतात टीव्ही माध्यमांत अनेक स्थित्यंतरे आली. ओरिशामध्येही ही स्थित्यंतरे सुरू आहेत. परंतु छोटे राज्य असले तरी माध्यमांची संख्या जास्त आहे. परिणामी जाहिराती आणि महसूल मिळविण्यासाठी माध्यमांत स्पर्धा सुरू झाली आहे. ही स्पर्धा आणखी वाढेल.'



डॉ. मृणाल चटर्जी

प्रा. भानावत म्हणाले, 'पत्रकारिता आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ मिळणे दुरापास्त होत चालले आहे. विद्यापीठे आणि माध्यमांनी यासाठी एकत्र येऊन काम करण्याची गरज निर्माण झाली आहे.' डॉ. मीरा देसाई म्हणाल्या, 'महिला प्रेक्षकांना समोर ठेवून कार्यक्रमांची निर्मिती होत आहे.' प्रारंभीपासून टीव्ही माध्यमात महिला कार्यरत आहेत.

## पत्रकारिता विभागातील राष्ट्रीय परिषदेचा समारोप

गेल्या काही वर्षात हे माध्यम गतीने बदलले असून, त्यात महिलांचा प्रभाव कायम राहिला आहे, असे प्रतिपादन पुण्याचा ईएमआरसीचे माजी संचालक डॉ. समीरन वाळवेकर यांनी केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र हुंजे, प्राध्यापक डॉ. प्रवीण पाटील उपस्थित होते. विभागप्रमुख डॉ. निशा मुढे-पवार यांनी स्वागत केले. अनुराधा इनामदार यांनी सूत्रसंचालन केले. चंद्रशेखर वानखेडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2019
पुढारी

# टीव्ही माध्यमांसमोर अनेक आव्हाने

## डॉ. चटर्जी : पत्रकारिता विभागातर्फे परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशातील टीव्ही माध्यमांसमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. विशेषत: महसूल उभा करण्याचे आव्हान सर्वात मोठे आणि गंभीर आहे, असे मत आयआयएमसीच्या ओरिसा येथील केंद्राचे विभागीय संचालक डॉ. मृणाल चटर्जी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्यावतीने आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. यावेळी गुजरात विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या प्रा. सोनल पांड्या व हिमालच प्रदेश विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या माजी प्रमुख डॉ. वीरबाला अग्रवाल आदी उपस्थित होते.

प्रा. चटर्जी म्हणाले, भारतात टीव्ही माध्यमांत अनेक स्थित्यंतरे आली. ओरिसामध्येही ही स्थित्यंतरे सुरु आहेत. परंतु छोटे राज्य असले तरी माध्यमांची संख्या जास्त आहे. परिणामी जाहिराती आणि महसूल मिळविण्यासाठी माध्यमांत स्पर्धा सुरु झाली आहे. ही स्पर्धा आणखी वाढेल. टीव्हीतून भूतप्रेतांचा तसेच महिलांना नकारात्मक पद्धतीने सादर करण्याचा प्रकार सुरु आहे.

प्रा. भानावत म्हणाले, पत्रकारितेचा पोत खपच बदलला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात पत्रकारितेच्या माध्यमातून मोठा उठाव होऊन लढा उभा राहिला. परंतु आता पत्रकारिता खूपच व्यावसायिक बनली आहे.

डॉ. मीरा देसाई म्हणाल्या, देशातील महिला सुरक्षित आहेत. परंतु महिला असुरक्षित असल्याची माहिती माध्यमे पसरवत आहेत. एक प्रकारचा भ्रम निर्माण करण्यात येत आहे. महिला अनेक क्षेत्रात नेटाने काम करत आहे. टीव्ही माध्यमातील महिला सक्षमपणे कार्यरत आहेत. कामाचे स्वरुप आणि जबाबदाऱ्या बदलत असल्या तरी महिला त्या समर्थपणे पेलत आहेत. स्वागत विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले. सूत्रसंचालन अनुराधा इनामदार यांनी केले. चंद्रशेखर वानखेडे यांनी आभार मानले.

9 MAR 2019

तरुण भारत

जनसंपर्क अधिकारी

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ताला-सुरात पार पडला संगीत नाटक महोत्सव

प्रतिनिधी

कोल्हापूर

संगीत व नाट्यशास्त्र विभागाने 'संगीत नाटक' महोत्सव ताला सुरात पार पडला. शिवाजी विद्यापीठामध्ये शुक्रवारी झालेल्या या महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्रसिध्द गायिका मधुवंती देव यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. दरम्यान, बबन माने व विद्यार्थ्यांच्या चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रथम सत्रामध्ये पुण्याच्या प्रसिध्द गायिका मधुवंती देव यांनी मुलांना मैफिलीची पूर्वतयारीविषयी मार्गदर्शन केले. याची सुरुवात मियां की तोडी या रागाने झाली. त्यांना तबल्याची साथ दिपक दाभाडे व हार्मोनियमची साथ संदीप तावरे यांनी केली. तसेच तानपुऱ्याची साथ मैत्रयी साने व गौरी पाध्ये यांनी केली.

दुपारच्या सत्रामध्ये जयपूर अत्रौली घराण्याचे ज्येष्ठ गायक पंडित अरुण कुलकर्णी यांचा माजी विभागप्रमुख डॉ. भारती वैशंपायन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांनी सादर केलल्या गायनास तबल्याची साथ निखिल भगत तसेच हार्मोनियमची साथ मधुसुधन शिखरे यांनी केली. तानपुऱ्याच्या साथीला प्रल्हाद जाधव व डॉ. आनंद धर्माधिकारी यांनी केली. तिसऱ्या सत्रात बारामतीचे अनिरुध्द खुटवड यांचे नाटक व अभिनयातील मुलतत्व' या विषयावर व्याख्यान झाले. नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे विद्यार्थी असलेल्या खुटवडांनी अनेक नाटकांचे दिग्दर्शन केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ विभागातील विद्यार्थ्यांना मिळाला. चौथ्या सत्रामध्ये ज्ञानेश मुळे संकल्पना आणि दिग्दर्शित संगीत व नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचा 'कलासंगम' हा कार्यक्रम सादर झाला. निवडक कवितांवर आधारित असलेल्या कार्यक्रमात संगीत, नाट्य, नृत्य व चित्रकलेच्या माध्यमातुन अविष्कृत करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. श्री. विनोद ठाकूर देसाई यांनी केले.

9 MAR 2019

लोकसत्ता

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रादेशिक वाहिन्यांमुळे सांस्कृतिक एकारलेपण - डॉ. उषाराणी नारायण

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**प्रादेशिक वाहिन्यांमुळे** दूरचित्रवाणीचा सर्वदूर प्रसार होण्यास मदत झाली असली, तरी त्यांच्या माध्यमातून प्रादेशिक स्तरावर प्रसृत होणारे सांस्कृतिक एकारलेपण चिंताजनक आहे, असे प्रतिपादन म्हैसूर विद्यपीठाच्या माजी पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. उषाराणी नारायण यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने 'प्रादेशिक वाहिन्यांमधील महिला' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेच्या उद्घाटन सत्रात बीजभाषण करताना डॉ. नारायण बोलत होत्या.

महिला या प्रसारमाध्यमांचा महत्त्वाचा आर्थिक कणा बनत असल्याचे सांगून डॉ. नारायण म्हणाल्या, प्रादेशिक आणि स्थानिक वाहिन्यांमुळे महिलांना दूरचित्रवाणीवर मोठी संधी प्राप्त झाली. त्यामुळे त्या या वाहिन्यांचा महत्त्वाचा आर्थिक कणा बनल्या आहेत. मात्र, त्यांचे येथील योगदान हे प्रागतिक स्वरूपाचे आहे की वस्तूकरणाच्या पातळीपर्यंतच मर्यादित आहे, याचा चिकित्सक अभ्यास करण्याची गरज आहे.

ओरिसा येथील डॉ. मृणाल चटर्जी यांनी संपादित केलेल्या 'महात्मा गांधी एक पत्रकार आणि संपादक' या पुस्तकाचे प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. संतोष चव्हाण यांच्या माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. स्मितील पाटील यांनी स्वागत केले. अधिविभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. अनुराधा इनामदार यांनी सूत्रसंचालन केले.

# लोकनेते बाळासाहेब देसाई जयंतीनिमित्त उद्या व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या वतीने त्यांच्या जयंतीनिमित्त रविवारी (दि. १०) शाहू स्मारक भवन येथील मिनी हॉलमध्ये सायंकाळी साडेपाच वाजता राजकीय विश्लेषक शरद कारखानीस यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे असतील. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र विभागाच्या अधिष्ठाता प्रा. डॉ. भारती पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. व्याख्यानास उपस्थित राहावे, असे आवाहन लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनिश पाटील यांनी केले आहे..

**पुढारी**

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



गगनबावडा : महिला दिनानिमित्त महिलांचा सत्कार करताना पी. एस. पांडव, सतीश देसाई आदी.

# स्त्रिया बंदनीय नसून वंदनीय : डॉ. पांडव

## डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयात महिला दिन

**गगनबावडा. प्रतिनिधी**

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयाच्या एन. एस. एस. व महिला सक्षमीकरण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च रोजी महिला दिन महाविद्यालय उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रमुख वक्ते म्हणून उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव तर प्रमुख उपस्थितीत संस्थेचे अध्यक्ष प्रा. सतीश देसाई, सचिव प्रा. डॉ. विद्या देसाई तसेच, अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन. व्ही. शहा होते. आपल्या व्याख्यानामध्ये डॉ. पांडव यांनी स्त्रियांची सद्यस्थिती, त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी याचा वेध घेतला. तसेच त्यांनी आपल्या भाषणात असे प्रतिपादन केले की, स्त्रिया या बंदनीय नसून वंदनीय आहेत. त्यामुळे त्यांना प्रत्येक क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. यावेळी प्रा. सतीश देसाई यांनी भारतीय विकासमध्ये स्त्रियांचे योगदान मोलाचे असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. विद्या देसाई यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. आदिनाथ कांबळे यांनी केले. तर, सूत्रसंचालन प्रा. डी. के. पाटील यांनी तसेच आभार प्रा. डी. बी. भोसले यांनी मानले.

जनसपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
F 9 MAR 2019
Times of India

# 76% summer exam results announced within deadline

File photo



The chancellor's office has made it mandatory to announce results within 30 days of the last paper of a particular exam

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The exam department of the Shivaji University, Kolhapur (SUK) has announced around 570 results of which 436 were done well within the 45-day deadline, while around 134 exceeded the deadline.

This was informed by Mahesh Kakade, SUK's Board of Examinations and Evaluation director on Friday. He added that the winter semester examination of the university was conducted from October 2018 to January 2019 for around 580 exams, of which the results of around 570 exams has been announced.

Kakade said that there were various reasons why 134 exams missed the deadline of 45 days, one of them being the strike of the teachers associated with teachers' bodies.

"The delay in conducting the exam resulted in faculties getting less time for assessment," he said, adding that the cultural activities, sports activities in the colleges make the assessment process a bit lengthy as the faculties are not available in such cases for the assessment.

"Many teachers also got election duties as booth level officers which compromised our resources from few regions," Kakade said.

Being asked how university will plan its examination as general elections are due in coming months, he said that in that teachers will be appointed for the election duties and it will be impossible to comment on how it will affect the varsity's exam process.

It should be noted that the SUK had asked all the colleges in the division to report the names of the teaching faculties who despite frequent notices skipped the assessment duties earlier in summer 2018 examinations.

It had said that the chancellor's office has made it mandatory to announce results within 30 days of the last paper of the particular exam for which all the available manpower must be utilised. However, the problem has remained persistent for the university in terms of unavailability of the evaluators.